महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०)

# महाराष्ट्र (राज्यास लागू असलेल्या विधीतून) "दुष्काळ" ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९६३

(५ ऑक्टोबर, २०१२ पर्यंत सुधारित)

# (Maharashtra Act No. XL of 1963)

# The Maharashtra Deletion of the term "Famine" (From Laws Applicable to the State) Act, 1963

*(as modified upto 5th October, 2012)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक,
शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.
२०१२

[किंमत : रु. ८.००]

# महाराष्ट्र (राज्यास लागू असलेल्या विधीतून) "दुष्काळ" ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९६३

## (सन १९६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०)

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

१. लघु संज्ञा

२. "दुष्काळ" या संज्ञेच्या संबंधातील उल्लेख काढून टाकण्याकरिता अधिनियम, इ. ची सुधारणा.

३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८३ यात सुधारणा आणि अधिसूचनेद्वारे राज्याचे इतर विधी अनुकूल करून घेण्याचा अधिकार.

अनुसूची.

(शा.म.मु.) एच ४१०६–१ (४,०९७–११-२०१२)

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.[१]

[महाराष्ट्र (राज्यास लागू असलेल्या विधीतून) " दुष्काळ " ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९६३.]

[११ नोव्हेंबर १९६३]

**महाराष्ट्र राज्यातील सर्व विधीतून " दुष्काळ " ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम**

**ज्याअर्थी,** राज्य सरकारकडून राज्यातील कृषिविषयक परिस्थितीचे वारंवार अवलोकन केले जात असून टंचाईच्या परिस्थितीची चिन्हे दिसू लागताच परिस्थितीनुसार मदतीच्या उपाययोजनांची तरतूद केली जाते व त्यामुळे दुष्काळी परिस्थिती वाढण्यास आता वाव राहिलेला नाही ;

१९५८ चा मुंबई अधिनियम, ८३.

**आणि ज्याअर्थी,** मुंबई राज्य दुष्काळ निवारण निधि अधिनियम, १९५८ आणि ह्या विषयाच्या संबंधात राज्यास लागू असलेले इतर विधी यातील " दुष्काळ " ही संज्ञा आता अप्रचलित झाली आहे, आणि त्यामुळे ती अशा विधीतून काढून टाकणे आवश्यक झाले आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

लघु संज्ञा.

१. या अधिनियमास महाराष्ट्र (राज्यास लागू असलेल्या विधीतून) " दुष्काळ " ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९६३ असे म्हणावे.

" दुष्काळ " या संज्ञेच्या संबंधातील उल्लेख काढून टाकण्याकरिता अधिनियम, इ. ची सुधारणा.

२. या अधिनियमाच्या प्रारंभापासून भारताच्या संविधानाच्या सप्तम अनुसूचीतील सूची २ व ३ मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात महाराष्ट्र राज्यास लागू असलेल्या अधिनियमातील (ज्यांच्या यापुढे " राज्य विधी " असा उल्लेख करण्यात आला आहे) आणि सर्व लेखातील व इतर दस्तऐवजातील " दुष्काळ " हा शब्द काढून टाकण्यात आला असल्याचे समजण्यात आले पाहिजे.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८३ यात सुधारणा आणि अधिसूचनेद्वारे राज्याचे इतर विधी अनुकूल करून घेण्याचा अधिकार.

३. (१) अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट केलेला अधिनियम, तिच्या स्तंभ २ मध्ये दाखविलेल्या रीतीने व मर्यादेपर्यंत याद्वारे सुधारण्यात येत आहे.

(२) ह्या अधिनियमाच्या प्रारंभापासून एक वर्ष संपण्यापूर्वी, राज्य शासनाला **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्याच्या कोणत्याही विधीतून " दुष्काळ " हा शब्द काढून टाकण्याचा अधिकार आहे आणि जिथे संदर्भावरून आवश्यकता असेल तिथे " दुष्काळ " या शब्दाऐवजी " टंचाई " हा शब्द दाखल करण्याचा आणि व्याकरणाच्या नियमानुसार त्यात आवश्यक अशा आनुषंगिक सुधारणा करण्याचा अधिकार आहे.

---

[१] उद्देश व कारण यांचे निवेदनासाठी, **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९६३, भाग पाच. इं. पृष्ठ क्रमांक १९८ पहा.

महाराष्ट्र (राज्यास लागू असलेल्या विधीतून) "दुष्काळ" ही संज्ञा काढून टाकण्याबाबत अधिनियम, १९६३.

**अनुसूची**

(कलम ३ पहा.)

| अधिनियम<br>(१) | सुधारणा<br>(२) |
|---|---|
| मुंबई राज्य दुष्काळ निवारण निधी अधिनियम, १९५८ (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८३.) | (१) दीर्घ संज्ञेत,—<br>(अ) "दुष्काळ निवारण निधी" या शब्दांऐवजी "टंचाई निवारण निधी" हे शब्द दाखल करावेत ;<br>(ब) "दुष्काळ किंवा तीव्र टंचाईची" या शब्दांऐवजी "टंचाईची" हा शब्द दाखल करावा.<br>(२) प्रस्तावनेतील तिसऱ्या परिच्छेदात,—<br>(अ) "मुंबई राज्य दुष्काळ निवारण निधी" या शब्दांऐवजी "महाराष्ट्र राज्य टंचाई निवारण निधी" हे शब्द दाखल करावेत ;<br>(ब) "दुष्काळ किंवा तीव्र टंचाईची" या शब्दांऐवजी "टंचाईची" हा शब्द दाखल करावा.<br>(३) कलम १, पोट-कलम (१) यात, "दुष्काळ" या शब्दाऐवजी "टंचाई" हा शब्द दाखल करावा.<br>(४) कलम २ मध्ये, "दुष्काळ" या शब्दाऐवजी "टंचाई" हा शब्द दाखल करावा.<br>(५) कलम ३ मध्ये, व त्याच्या समास टीपेत "दुष्काळ" या शब्दाऐवजी "टंचाई" हा शब्द दाखल करावा.<br>(६) कलम ४ मध्ये, "या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या दुष्काळ निवारण निधीत" या मजकुराऐवजी "या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या निधीत" हा मजकूर दाखल करावा.<br>(७) कलम ५ मध्ये, "दुष्काळ किंवा तीव्र टंचाई" व "दुष्काळाच्या किंवा तीव्र टंचाईच्या" या मजकुराऐवजी अनुक्रमे "टंचाईची" व "टंचाईच्या" हे शब्द दाखल करावेत. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग,
  **मुंबई ४०० ००४.**
  दूरध्वनी : ०२२–२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९
- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  **पुणे ४११ ००१.**
  दूरध्वनी : ०२०–२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाइन्स,
  **नागपूर ४४० ००१.**
  दूरध्वनी : ०७१२–२५६२ ६१५
- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  **औरंगाबाद ४३१ ००१.**
  दूरध्वनी : ०२४०–२३३१ ४६८, २३३१ ५२५
- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  **कोल्हापूर ४१६ ००३.**
  दूरध्वनी : ०२३१–२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**